पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ४४**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १४/१/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १९९२**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे डिसेंबर २०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/९३० दि.७/१/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १९९३**

मा.सुशील मेंगडे यांचे दि.३/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.३१ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थाशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक पान क्र.२७१, अ.क्र. ३२७, बजेट कोड :- CE26A336/SU1-1327 पुणे शहर व लगतच्या टेकड्यांवर शहरी जलयुक्त शिवार योजना राबविणे | १ कोटी | --- |
| | नविन सुचवलेली कामे | | १० लक्ष |
| १ | प्रभाग क्र.३१ अ मध्ये जावळकर उद्यानामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | | १० लक्ष |
| २ | प्रभाग क्र.३१ अ मध्ये भालेकर उद्यानामध्ये विविध विकास कामे करणे. | | १० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.३१ अ मध्ये स.नं.११ मधील उद्यानामधील उर्वरित कामे करणे. | | १० लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.३१ अ मध्ये जावळकर उद्यानामध्ये हॉर्टीकल्चर विषयक कामे करणे. | | १० लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.३१ अ मध्ये जावळकर उद्यानामध्ये स्प्रिंकलर विषयक कामे करणे. | | १० लक्ष |
| ६ | प्रभाग क्र.३१ अ मध्ये स.नं. ११ मधील उद्यानामध्ये हॉर्टीकल्चर विषयक कामे करणे. | | १० लक्ष |
| ७ | प्रभाग क्र.३१ अ मध्ये उद्यानामधील खेळणी पटातील दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे. | | १० लक्ष |
| ८ | प्रभाग क्र.३१ अ मध्ये भालेकर उद्यानामध्ये हॉर्टीकल्चर विषयक कामे करणे. | | १० लक्ष |
| ९ | प्रभाग क्र.३१ अ मधील उद्यानामध्ये विद्युत विषयक कामे करणे. | | १० लक्ष |
| १० | प्रभाग क्र.३१ अ मधील स. नं. ११ मधील उद्यानाचे प्रवेशद्वार व तदनुषंगिक कामे करणे. | | १० लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १९९४**

मा.सौ.अश्विनी पोकळे यांचे दि.६/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.४२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ८० लक्षाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थाशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, पान क्र.१९८ अनु.क्र.१ बजेट कोड :- CE20A1266/A18-12 नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांमध्ये विविध विकासाची कामे करणे. | ८० लक्ष | --- |
| | नविन सुचवलेली कामे | | |
| १ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गाव येथील जुनी तालीम नव्याने विकसित करणे. | | २० लक्ष |
| २ | प्रभाग क्र.४२ ब धायरी सि.स.नं. १३५२ व १३५३ पवळी चौक, काळ भैरव नाथ मंदिर परिसरात चौक सुशोभीकरण करणे. | | ३५ लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.४२ ब धायरी येथील जैतूजी महाराज समाधी मंदिर परिसर सुशोभित करणे. | | २५ लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १९९५**

मा.सौ.अश्विनी पोकळे यांचे दि.६/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.४२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ३.२५ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थाशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक<br>बजेट कोड :-CE20A884/SA10-598 नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये रस्ता करणे. (आंबेगाव बु.) | १ कोटी | --- |
| २ | बजेट कोड :- CE20A1266/A18-52 आगम मंदिराजवळील पाण्याची टाकी ते पतंगराव कदम यांचे बंगले दरम्यान रस्ते डांबरीकरण करणे.(आंबेगाव खु.) | १ कोटी<br>९० लाख | --- |
| ३ | बजेट कोड :-CE20A1266/A18-54 आंबेगाव बु.येथील सिंहगड कॉलेज परिसरात विविध रस्ते डांबरीकरण करणे. | ३५ लाख | --- |
| | नविन सुचवलेली कामे | | |
| १. | प्रभाग क्र. ४२ ब आंबेगाव बु. गावठाण परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | १५ लाख |
| २. | प्रभाग क्र. ४२ ब आंबेगाव बु. गावठाण परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | १५ लाख |
| ३. | प्रभाग क्र. ४२ ब आंबेगाव बु.दभाडी परिसरात रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |
| ४. | प्रभाग क्र. ४२ ब आंबेगाव बु.सिंहगड कॉलेज परिसरात रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |
| ५. | प्रभाग क्र. ४२ ब आंबेगाव खु.लिपाणे नगर परिसरात रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |
| ६. | प्रभाग क्र. ४२ ब आंबेगाव खु.हनुमान नगर परिसरात रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |
| ७. | प्रभाग क्र. ४२ ब आंबेगाव खु.वाघजाई नगर परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |
| ८. | प्रभाग क्र. ४२ ब आंबेगाव खु.शनी नगर परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |
| ९. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील डी.एस.के.विश्व परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | २५ लाख |
| १०. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील महादेव नगर मध्ये बालाजी ग्रीन सोसायटी परिसरातील रस्ते विकसीत करणे. | | २० लाख |
| ११. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील मतेनगर परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | २० लाख |
| १२. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील महादेव नगर, कौस्तुभ सदन ते माऊली बंगला परिसरातील रस्ता विकसीत करणे. | | २० लाख |
| १३. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील महादेव नगर स.नं. ५३ अ येथील विविध ठिकाणी रस्ता करणे. | | २० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील रायकर मळा काळुबाई मंदिर परिसरात विविध ठिकाणी रस्ता करणे. | | २० लाख |
| १५. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील कामठे वस्ती ते पोकळे वस्ती परिसरात विविध ठिकाणी रस्ता करणे. | | २० लाख |
| १६. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील रायकरमळा स.नं.७५/९ विविध ठिकाणी रस्ता विकसीत करणे. | | २० लाख |
| १७. | प्रभाग क्र. ४२ ब धायरी येथील रायकरमळा स.नं.१६९/२ विविध ठिकाणी रस्ता विकसीत करणे. | | २० लाख |
| १८. | प्रभाग क्र. ४२ ब धायरीगावठाण परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | २० लाख |
| १९. | प्रभाग क्र. ४२ ब शिवणे येथील स.नं.१ परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |
| २०. | प्रभाग क्र. ४२ ब शिवणे येथील शिंदे पूल परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |
| २१. | प्रभाग क्र. ४२ ब उत्तमनगर विठ्ठल मंदिर परिसरात विविध ठिकाणी रस्ते विकसीत करणे. | | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १९९६**

मा.राजेश बराटे यांचे दि. ७/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. ३१ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, बजेट कोड नं. सीई२०सी३५२/एसबी५-२३३७, प्रभाग क्र. ३१ ड मधील विकास चौकातील विद्युत ट्रान्सफर्मची जागा बदल करणे | २० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे –</u>** | | |
| १) प्रभाग क्र. ३१ ड मधील विविध ठिकाणी विद्युत पोल बसवून प्रकाश व्यवस्था करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ३१ ड मध्ये सम्राट अशोक विद्यालयमध्ये विद्युत विषयक कामे व विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. १९९७**

मा.दिपक मानकर व मा.भैय्यासाहेब जाधव यांचे दि. ७/१/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचा मिळकत कर वेळेत न भरल्यास प्रतिमहा २ टक्के दंड आकारला जातो. म्हणजेच एका वर्षात २४ टक्के इतका दंड आकारला जातो. दंडाची ही रक्कम जाचक असून नागरिकांकडून दंडाची रक्कम कमी करणेबाबत अनेकवेळा मागणी केली जाते. पुणे महानगरपालिकेकडून पूर्वी मिळकत कराची अभय योजना राबवून दंडाच्या रकमेतून सूट देण्यात आली होती. यावेळी पुणे महानगरपालिकेस कोटयावधी रूपयांचे उत्पन्न मिळाले होते. वास्तविक मिळकत कराची पावती प्राप्त न झाल्याने अनेक नागरिकांकडून मिळकत कर वेळेत भरला जात नाही. तद्नंतर दंडाची जाचक रक्कम मिळकत करात समाविष्ट होवून मिळकत कराची रक्कम जास्त असल्याने गोरगरीबांना सदर रक्कम भरणे शक्य होत नाही. पर्यायाने दंडाची रक्कम वाढत जाते. सद्यस्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेने मिळकत कराबाबत अभय योजना राबविली असून त्याच धर्तीवर पुणे महानगरपालिकेने मिळकत कराबाबत अभय योजना राबवावी.

सबब गोरगरीब नागरिकांसाठी निवासी मिळकत कराबाबत पुणे महानगरपालिकेने अभय योजना राबवावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १९९८**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ६/७/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ६/७/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९१० दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ८,८१,१३५/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. १९९९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १३/७/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १३/७/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९११ दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये २,६६,७६६/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २०००**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २०/७/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २०/७/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९१२ दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १२,३०,०६५/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २००१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २७/७/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २७/७/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९१३ दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १५,७९,६१५/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २००२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ३/८/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ३/८/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९१४ दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १४,९४,१३२/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २००३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १०/८/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १०/८/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९१५ दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये २७,९७,३३५/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २००४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १७/८/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १७/८/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९१६ दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ५,६५,०२१/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २००५**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २४/८/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २४/८/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९१७ दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये २८,५९,८६०/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २००६**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ३१/८/२०१९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ३१/८/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१९१८ दि. ३/१/२०२० ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १४,६५,६२०/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २००७**

दि. २/१२/२०१९ ते दि. ८/१२/२०१९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ५२ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशामन/९२५ दि. ४/१/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. २००८**

पुणे महानगरपालिका ढोले पाटील रोड आरोग्य कार्यालयाकडील डॉ.श्री.धेंडे संदीप जयराम, हुद्दा-वैद्यकीय अधिकारी (वर्ग-२) यांच्या निलंबन कालावधीची पहिली सहामाही दि. १३/९/२०१८ रोजी पूर्ण झाली असून दि.१३/३/२०१९ रोजी दुसरी सहामाही पूर्ण झाली असून मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/९२१ दि. ३/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २००९**

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडील श्री.उमेश अविनाश चव्हाण, क्लिनर यांचे निलंबन कालावधीस दि. २६/१२/२०१९ रोजी तीसरी सहामाही पूर्ण झाली असून मनपा सेवाविनियम क्र.५८ नुसार सदर बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/९२० दि. ३/१/२०२० चे पत्र.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. २०१०**

प्रभाग क्र. २६ महमंदवाडी कौसरबाग मध्ये श्रीराम चौक विविध ठिकाणी चौक सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदगुरु कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५३,५३,२७५=४० पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५३,००,२७७=९७ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये ६,४२,३९३=०५ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये३,९९०/- पर्यंत अदा करणेस तसेच टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९३१ दि. ७/१/२०१९ चे पत्र.

**विषय क्र. २०११**

प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध ठिकाणी रस्ते करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर.टी.दाते यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७०,४०,५४५=२५ पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,७०,१३९=८० पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये ८,४४,८६५=४३ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ९८,९३८/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १५,३३१/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९३२ दि. ७/१/२०१९ चे पत्र.

**संकीर्ण**

**विषय क्र. २०१२**

सन २०२०-२०२१ या वर्षाचे मिळकतकराचे दरास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टॅक्स/९२३ दि.४/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०१३**

नायडू हॉस्पीटल नजिक डॉग पॉडचे वापरात असलेले जुने बांधकाम निर्लेखित (write off) करुन सदर ठिकाणी नव्याने अधिक क्षमतेचे सुसज्ज डॉग पॉड उभारण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/८६४, दि.१९/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र. ९४ दि.६/१/२०२० चा विचारासाठी.

**विषय क्र. २०१४**

मा.आबा बागुल यांचे दि.८/१/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचे जकात, एल.बी.टी. असे विविध कर बंद झाल्यामुळे उत्पन्न कमी झाले आहे. गेले अनेक वर्षात अंदाजपत्रकात असलेल्या अंदाजापेक्षा पुणे महानगरपालिकेचे उत्पन्न कमी आल्याचे स्पष्ट झालेले आहे. परिणामी निधी अभावी शहरात विकास कामे करण्यास अडचणी येवून अनेक मोठ मोठे प्रकल्प रखडलेले आहेत. पुणे महानगरपालिकेस मिळकत कर हे उत्पन्नाचे प्रमुख माध्यम आहे. मिळकतकरातून मिळणारे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करीत असताना प्रशासनाला अधिकारी व कर्मचारी यांची कमतरता असल्याने कर आकारणी करणे व वसुल करणे ही प्रमुख कामे अपूर्ण राहतात. याचा पुणे मनपाच्या उत्पन्नावर थेट परिणाम होतो. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत अनेक मिळकतींवर कर आकारणी झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. यासाठी पुणे मनपाने जी.आय.एस मॅपींग चा प्रयोग केला असून तो पुर्णपणे यशस्वी झालेला नाही.

मिळकत करातून मिळणारे उत्पन्न वाढविण्यासाठी घरोघरी जाऊन मिळकत कर भरला आहे अगर कसे? मिळकत कराची आकारणी झाली आहे का? याची तपासणी करणेसाठी क्षेत्रीय कार्यालयाकडील मिळकत कर विभाग व्यतिरिक्त इतर कर्मचा-यांची मदत घेणे अत्यावश्यक झालेले आहे.

मिळकत कर विभागातील कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे अन्य कर्मचाऱ्यांची मदत घेऊन त्यांना जास्तीत जास्त आकारणी न झालेल्या मिळकती शोधुन कर आकारणीचे काम करण्यात यावे. या कामासाठी सदर कर्मचारी यांस योग्य ते जास्तीचे वेतन देण्यात यावे. जेणे करून सदर कर्मचारी यांचेकडून जास्ती जास्त मिळकती शोधून त्यावर कर आकारणी करून पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये कोट्यावधी रूपयांची वाढ होईल.

**विषय क्र. २०१५**

मा.अरविंद शिंदे यांचे दि.८/१/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या हददीत जाहिरात नियमावली २००३ व वाहतूक पोलीस ना-हरकत दाखला यांचा भंग करणारे बहुतांशी जाहिरात फलक पाडण्याचे मा.उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही प्रशासन कोणतीही ठोस कार्यवाही करत नाही. पुणे शहरात बहुतांशी ठिकाणी फुटपाथ, रस्त्याच्या कॅरेज विडथमध्ये, इमारतीच्या साईड व फ्रंट मार्जिनमध्ये, भोगवटा नसलेल्या इमारतीच्या टेरेसवर, नदीपात्र, नालेपात्र, धार्मिक स्थळांच्या आवारात, शैक्षणिक संकुलात, जमिनीपासून ४० फुट उंचीवर, शासकीय व निम शासकीय जागेत विनापरवाना व इमारतीच्या प्रकाशवायु योजनेस अडथळा आणणारे कायदेशीररित्या अवैध जाहिरात फलक उभे असलेले दिसून येत आहेत. शहराचे मोठया प्रमाणावर विद्रुपीकरण, महसूल हानी या जाहिरात फलकांमुळे होत आहे. उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असूनही प्रशासन बेकायदेशीर जाहिरात फलक काढणेसाठीच्या निविदेस जाणीवपूर्वक विलंब लावत आहे, ही बाब प्रशासनाच्या वतीने बेकायदेशीर जाहिरात फलकांना अप्रत्यक्ष संरक्षण देण्याचा प्रकार निर्देशित करणारी आहे.

पुणे महानगरपालिका प्रशासन उच्च न्यायालयात पुणे मनपा हददीतील बेकायदेशीर जाहिरात फलक काढणेचा मासिक अहवाल सादर करत असते. पुणे महानगरपालिका मुख्य इमारत, आकाशचिन्ह विभागाचे कार्यालय असलेले वीर सावरकर भवन, महानगरपालिकेची सर्व क्षेत्रिय कार्यालये, महापालिका आयुक्तांचे निवासस्थान, महापौर-उपमहापौर यांचे निवासस्थान, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, गटनेते, सर्व मा.सभासद यांच्या निवासस्थान व कार्यालये यापासून १०० मीटर परिघातील सर्व जाहिरात फलकांची कायदेशीर वैधता दक्षता विभाग, वरिष्ठ अधिका-यांच्या देखरेखीखाली तपासून कायदयाचा अनादर करणारे जाहिरात फलक तातडीने काढून टाकण्यात यावेत. जेणेकरून उच्च न्यायालयाच्या आदेशाचे काही प्रमाणात पालन होईल व बेकायदेशीर जाहिरात फलकांचे शहर ही पुणे शहराची होत असलेल्या नव्या मलीन होणाऱ्या प्रतिमेस आळा बसेल. बेकायदेशीर जाहिरात फलक काढून टाकणेचा खर्च सदर जाहिरात फलकास परवानगी, नूतनीकरण देणा-या आकाशचिन्ह परवाना निरिक्षक व वरिष्ठ अधिका-यांच्या वेतनातून वसूल करण्यात यावा.

**विषय क्र. २०१६**

मा.गणेश ढोरे यांचे दि.८/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.४२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. १२६ लक्षाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, पान क्र. १९८ , ( यादी.क्र. ए १८ ) **बजेट कोड- सी ई २० ए १२६६ /ए १८-२४** फुरसुंगी गावातील शेततळयाच्या बाजुच्या कॅनॉलवरील वाकड्या पुलाचे कामे करणे | १२६ लक्ष | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे –</u>** | | |
| १) प्रभाग क्र.४२अ फुरसुंगी मधील शिवतेजनगर लेन नं.१ डांबरीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.४२अ फुरसुंगी मधील शिवतेजनगर लेन नं.२ डांबरीकरण करणे | --- | १५ लक्ष |
| ३) प्रभाग क्र.४२अ फुरसुंगी मधील शिवतेजनगर लेन नं.३ डांबरीकरण करणे | --- | १५ लक्ष |
| ४) प्रभाग क्र.४२अ फुरसुंगी मधील शिवतेजनगर लेन नं.४ डांबरीकरण करणे | --- | १५ लक्ष |
| ५) प्रभाग क्र.४२अ फुरसुंगी मधील शिवतेजनगर लेन नं.५ डांबरीकरण करणे | ---- | १५ लक्ष |
| ६) प्रभाग क्र.४२ अ फुरसुंगी गुरुद्त कॉलनी लेन नं. १ मध्ये रस्ता डांबरीकरण करणे | ---- | २०लक्ष |
| ७) प्रभाग क्र.४२ अ फुरसुंगी गुरुद्त कॉलनी लेन नं. १ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | ---- | २०लक्ष |
| ८)प्रभाग क्र.४२ अ फुरसुंगी, कानीफनाथनगर मधील रस्ता डांबरीकरण करणे. | ---- | ११लक्ष |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. २०१७**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी, कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/१२/२०१९ ते दि.३१/१२/२०१९ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/४५१२ दि.७/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०१८**

पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता मे.डेस्क कन्सल्टंट यांचे तज्ञ सल्लागारांच्या पॅनेलमध्ये प्रोजेक्ट र.रुपये ५.०० ते २०.०० कोटीपर्यंत वर्ग (II) मध्ये नाव समाविष्ट करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९३३ दि.७/१/२०२० चे पत्र.

**विषय क्र. २०१९**

पुणे महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत सहा महिने मुदतीकरीता मासिक एकवट मानधन तत्वावर काम करणाऱ्या सेवकांच्या मानधनाबाबत मा.हेमंत रासने व मा.उमेश गायकवाड यांचे दि. १३/११/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४७२ दि. १३/११/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/सविवि/९३४ दि.८/१/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**राजेंद्र शेवाळे**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**